# पुन्हा एकदा 'श्यामची आई' – माधव वझे

मराठीतील सर्वाधिक खपाच्या पुस्तकांमध्ये आजही साने गुरुजींचे 'श्यामची आई' हे पुस्तकं आहे.पुस्तकाचे प्रकाशन झाले त्याला आता ७५ वर्षे होऊन गेली तरी त्याची लोकप्रियता किंचितही ओसरलेली नाही. उलट ती वाढते आहे असे दिसते. श्यामची आई चित्रपटात मी श्यामची भूमिका केल्याचे ज्यांना माहित आहे, असे अनेक स्त्री-पुरुष या ना त्या निमित्ताने कुठे कुठे जेंव्हा भेटतात तेंव्हा त्यांच्या बरोबर असलेल्या नातवंडांशी माझी ओळख तर करून देतातच, शिवाय आपल्या नातवंडांनी 'श्यामची आई' वाचल्याचे ते आवर्जून सांगतात. ते तोंडदेखले नसावे. कारण पुस्तकातल्या एकदोन प्रसंगांचा उल्लेख ती लहान मुले करतात आणि वाचताना रडू आल्याचेही काहीसे लाजत लाजत सांगतात. आता चित्रपटाची डीव्हीडी मिळते आणि तीही घरोघरी पाहिली जात असली तरी पुस्तकही मोठ्या प्रमाणवर वाचले जात आहेच .

'श्यामची आई' पुस्तकाबद्दलची माझी स्वतःची आठवण अगदी निराळी आहे .माझ्या मुंजीत त्या पुस्तकाच्या ५-६ प्रती मला भेट मिळाल्या होत्या. ("बालमनावर संस्कार करणारे" दुसरे कोणतेच पुस्तकं बहुधा आसमंतात नसावे. आणि कदाचित आजही नसावे!) एक प्रत घरात ठेवून बाकीच्या प्रती घरातल्यांनी नातेवाईकांना दिल्या. भेट मिळालेले 'श्यामची आई' वाचण्यासाठी मी हातात घेतले तर ते मला वाचावेसे वाटेना. पुस्तकाची पाने काहीशी काळवंडलेली होती. पानावरची अक्षरे बारीक होती. काहीतरी किचकट असणार असेच वाटायला लागले. नेट करून वाचायचा प्रयत्न केला तर पुस्तकं मधूनमधून खरोखरच कंटाळवाणे वाटायला लागले. शिवाय कित्येक शब्दांचे अर्थच कळेनात. त्यांचे अर्थ पुस्तकात अगदी शेवटच्या पानावर दिले होते. प्रत्येकवेळी मागच्या पानावर जाऊन अर्थ पाहायचा हेही कंटाळवाणे आणि जिकीरीचेच होत राहिले. त्यामुळे 'श्यामची आई' हे पुस्तकं मी चित्रपटात भूमिका केली तरी वाचले नव्हते. कित्येकांना धक्काच बसेल. पण ते खरे आहे. 'श्यामची आई' बद्दल आणखी काही लिहिण्या आधी आणखी एका धक्क्याबद्दल मी लिहिले पाहिजे.

साने गुरुजी कथामालेचे देश पातळीवरचे अधिवेशन पुण्यामध्ये भरले होते, त्यावेळची गोष्ट. एका परिसंवादामध्ये मला बोलायचे होते. बाळासाहेब भारदे त्या सत्राचे सूत्रधार होते. 'आई आणि संस्कार' या संदर्भात बोलताना मी म्हटले की माझ्यावर आईचे नाहीत तर माझ्या वडिलांचे जास्त संस्कार झाले आहेत. बाळासाहेब भारदे यांना ते सत्य स्वीकारता आले नाही. "प्रत्यक्ष श्यामच आईने संस्कार केले नाहीत असे म्हणतो आहे, तर मग यावर आपण काय बोलणार?"-अशा शब्दात त्यांनी माझी संभावना आणि चेष्टा केली अधिवेशनाला आलेल्या हजारो कार्यकर्त्यांनीही हसून आणि टाळ्या वाजवून त्याला दाद दिली. ("आपले एखादे शिक्षक, एखादा नातेवाईक, एखादा शेजारीदेखील आपली 'आई" का नाही असू शकत?" असा प्रश्न माझ्या भाषणात मी केला होता). श्यामची आई आणि माधव वझे असे एक अद्वैत असल्याचे कोणी ठरविल्या नंतर माधव वझेला कोणे एके काळी 'श्यामची आई' हे पुस्तकं कंटाळवाणे वाटले होते हे वास्तव समजून घ्यायला अवघडच जाणार.

'श्यामची आई' हे पुस्तकं आता मात्र मला अतिशय आवडते. ते पुस्तकं लहान मुलांसाठी नसून प्रत्यक्षात वडीलधाऱ्या माणसांसाठी आहे असे जर मी म्हटले तर अनेकांना पुन्हा एकदा धक्का बसेल. पण त्याआधी मलाच एक धक्का बसला आहे तो असा की प्रौढ स्त्री-पुरुषांनी बहुधा पुस्तक न वाचताच ते लहान मुलांसाठी असल्याचे ठरवून टाकले

आहे. मला तर असे वाटते की हे पुस्तकं आपल्यासाठी आहे या गोष्टीकडे सरळ सरळ दुर्लक्ष करून प्रौढांनी स्वतःची प्रतारणा तर केली आहेच, शिवाय लहान मुलांवर अन्याय केला आहे..

कोणतेही पुस्तकं, त्या पुस्तकातच असते. त्याचे स्वरूप, त्याचा विषय-आशय, त्याचे गुण-दोष आणि त्याचा वाचकवर्ग यांची स्वच्छ कल्पना पुस्तक वाचले की येते. पानापानावरच्या अक्षरात ते सगळे वाचायला मिळते. त्यामुळे विशिष्ट पुस्तकाबद्दल त्या पुस्तकाच्या आधारानेच काही विधान करता येते.

'श्यामची आई' हे पुस्तकं त्याला अपवाद नाही.

'श्यामची आई'- लेखक, पांडुरंग सदाशिव साने – पुणे विद्यार्थी गृह प्रकाशन, पुनर्मुद्रण २१वे, वर्ष १९८५ या पुस्तकातले संदर्भ घेत, प्रस्तुत विश्लेषण असणार आहे.

गुरुजीनीच पुस्तकाला 'प्रस्तावना' लिहिली आहे. ती वाचून कळते की गुरुजींनी नाशिकच्या तुरुंगात १९३३ मध्ये पाच दिवसात या पुस्तकातल्या 'रात्री' (प्रकरणे) लिहिल्या. तुरुगातल्या मित्रांना त्या वाचून दाखवीत असता तेही रडले आणि गुरुजीही रडले. पुढे तुरुंगातून बाहेर आल्यावर गुरुजींच्या अनेक 'बंधू भगिनींनी त्या रात्री वाचल्या आणि त्यांनाही रडू आले.---

इथे क्षणभर थांबूया. तुरुंगात गुरुजींनी ज्या कैद्यांना 'श्यामची आई' चे हस्तलिखित वाचून दाखविले त्यांचा वयोगट कोणता असेल? आणि तुरुगातून बाहेर आल्यावर ज्या 'बंधू भगिनींनी' ते वाचले त्यांचाही वयोगट कोणता असेल?—अर्थातच ते पहिले श्रोते आणि वाचक नक्कीच लहान मुले नव्हती. कमीतकमी २० ते ३० या वयोगटातले ते पहिलेवहिले श्रोते आणि वाचक असले पाहिजेत. .

पुस्तक 'प्रारंभ' यापासून सुरु होते.पृष्ठ १ ते ५ 'प्रारंभ' आहे. तिथे साने गुरुजी म्हणतात, "पुष्कळ वेळा मनुष्याचा मोठेपणा त्याच्या आईबापावर अवलंबून असतो. त्याचे पुढचे बरे-वाईट जीवन त्याच्या आईबापावर अवलंबून असते.---मुलांचे जीवन बिघडविणे यासारखे पाप नाही.—वसिष्ठ ऋषी वेदामध्ये वरूण देवाला म्हणतात, "हे वरुणदेवा! माझ्या हातून जर काही वाईट झाले असेल तर त्याबद्दल माझ्या वडिल मंडळीस जबाबदार धर."— गुरुजी तुरुंगातल्या कैदी मित्रांना असे सांगत असताना मधूनच ते आत्मप्रौढी विषयी बोलतात. त्यावेळी तिथे असलेला नारायण म्हणतो, "मी निरहंकारी आहे याचाच एखादे वेळेस अहंकार व्हावयाचा.---"

गुरुजींचे हे प्रवचन काय लहान मुलांसाठी आहे? (गुरुजींनी स्वतः 'गोष्टीरूप प्रवचने' असे म्हटले आहे –पृष्ठ ४२) विश्वामित्राच्या गोष्टीची साक्ष काढून गुरुजी सरळसरळ प्रौढ माणसांना इशारा देत आहेत की ती स्वतः चांगली वागतील, तरच त्यांची मुलेही पुढे चांगले वागतील. आणि नारायण जे काही म्हणतो ते 'श्यामची आई' वाचणाऱ्या लहान मुलांना कळेल असे खरेच आपल्याला वाटते काय? म्हणजे तो 'नारायण' निदान युवागटातला तर असेल?

वटपौर्णिमेच्या दिवशी श्यामची आई आजारी असल्यामुळे वडाला १०८ प्रदक्षिणा घालायला ती श्यामला सांगते. श्यामला त्याची लाज वाटते. हा प्रसंग सांगून गुरुजी पुढे लिहितात, (पृष्ठ १२)-- "देवाच्या कामाची, देशाच्या कामाची भारतमातेच्या कामाची आम्हाला लाज वाटते. परंतु वाईट पुस्तके वाचण्याची, वाईट सिनेमा पाहण्याची, विडी सिगारेट ओढण्याची, चैन करण्याची लाज वाटत नाही. सत्कर्म करण्याची लाज वाटू लागली आहे असत्कर्म करण्यात प्रौढी व संस्कृती येऊन राहिली आहे. फार वाईट स्थिती आहे ही."

--कोणत्या वयोगटासाठी हे प्रवचन आहे असे म्हणायचे? लहान मुलांसाठी, म्हणजे किती वर्षाची लहान मुले? खरे तर कुमारगटासाठी तरी हे आहे असेही म्हणता येणार नाही. महाविद्यालयीन युवा-युवतींसाठी ते आहे.

साने गुरुजींच्या बहिणीचे-म्हणजे आक्काचे लग्न पत्रिकेत मंगळ असल्यामुळे होत नव्हते. शिवाय हुंड्याचा प्रश्न होताच. त्या निमित्ताने गुरुजी लिहितात ,"हुंड्याची चाल नाहीशी व्हावी म्हणून वीस वर्षापूर्वी स्नेहलतेने बंगालमध्ये स्वतःला जाळून घेतले. त्या वेळेस क्षणभर तरुणांनी हुल्लड केली. सभा भरविल्या,ठराव केले; परंतु पुन्हा सारे थंड! हुंडे पाहिजेत, शिक्षणाचा खर्च पाहिजे,आंगठी पाहिजे,दुचाकी पाहेजे, घड्याळ पाहिजे. मुलीचे पैसे घेणे वा मु.लाचे घेणे, दोन्ही गोष्टी सारख्याच निंद्य ---तोंडाने धर्माचा तोरा सारे मिरवतात;पण कृतीने धर्माची सारी थट्टाच आहे.उदार हृदये ज्यांची ते तरुणही मेलेलेच!----"(पृ.१५)

गुरुजींचे हे प्रकट चिंतन लहान मुलांसाठी आहे असे कसे म्हणता येईल? आणखी एक संदर्भ पाहून पुढच्या मुद्द्याकडे जाऊया.

गावामध्ये श्याम एका लग्नघरी गेला होता. जेवणाच्या पंक्तीत प्रथेप्रमाणे दक्षिणा देण्यासाठी यजमान आले. सहसा दक्षिणा मोठ्या माणसाना दिली जाते. लहान मुलांना नाही. पण श्यामने हात पुढे केला आणि त्याला दक्षिणा मिळाली. त्याने आनंदित होऊन घरी आल्यावर श्यामने ती दक्षिणा आईकडे दिली. सगळा प्रकार समजल्यावर आईने श्यामची कानउघाडणी केली. "आपण गरीब असलो तरी भिक्षुक नाही" असे त्याला निक्षून सांगितले. (पृ.५५)
हा प्रसंग वर्णन करून गुरुजी लिहितात, "अलीकडे स्वाभिमानच उरला नाही. पैशासाठी आपण हपापलेले आहोत. फुकट मिळेल ते घ्यायचे. आगगाडीतून जपानी एजंट सिगारेट वगैरे फुकट वाटतात व श्रीमंतही त्या फुकट सिगारेट घेऊन ओढताना मी बघितले आहे--- तुका म्हणे घेतो देतो, तोही नरका जातो." ---त्या नंतर गुरुजी अमेरिकेच्या एका अध्यक्षांचे उदाहरण देऊन प्रवचनपर सविस्तर लिहीतात.(पृ.५५-५६).

'श्यामची आई' या पुस्तकातल्या ४२ रात्रीमध्ये (प्रकरणे) लहानपणच्या घटना-प्रसंग आणि त्याना अनुसरून केलेले असे भाष्य यांचे प्रमाण पाहिले तर ते हे अनुक्रमे १/३ व २/३ असे असल्याचे दिसते. पुस्तकाचा बराचसा भाग त्या भाष्याने व्यापलेला आहे. साने गुरुजींचे ते भाष्य आणि त्याची भाषा- दोन्ही अत्यंत परिणामकारक आहेत यात शंकाच नाही. पण ते लहान मुलांसाठी मुळीच नाही.

लहानपणी हे पुस्तक वाचताना मला विलक्षण कंटाळा आला तो विनाकारण नव्हता. आणि आता ते पुस्तक मला अतिशय आवडते तेही विनाकारण नाही!

'श्यामची आई'या पुस्तकाने पिढ्यानपिढ्या लहान मुलांवर संस्कार केले असे म्हटले जाते. संस्कार म्हणजे जडणघडण. ती जडणघडण प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे होत असते. ती एक प्रक्रिया असते. कोणत्या प्रतीचे 'बी' जमिनीवर टाकले जात आहे हे जसे महत्वाचे त्याप्रमाणे 'माती'चा कस कसा आहे हेही महत्वाचे. आपण पाहतो की 'श्याम संवेदनशील-कदाचित अती संवेदनशील होता. 'श्याम'वर त्याच्या आई-वडिलांच्या प्रत्यक्ष आचरणाचे संस्कार झाले हे लक्षात घेतले पाहिजे. श्यामच्या वडिलांचे, म्हणजे 'भाऊंचेही काही कमी संस्कार श्यामवर झाले नसणार, हे ते पुस्तक नीट वाचले तर कळून येते. त्या दोघांनी केवळ उपदेश केला असे दिसत नाही. 'आधी केले, मग सांगितले'—हा जडण घडण करण्याचा सगळ्यात उत्तम मार्ग होय हे त्याना माहित असावे

‘श्यामची आई’ या पुस्तकाने पिढ्यापिढ्यांवर संस्कार केले हे म्हणणे खरे नाही. पुस्तक वाचताना अनेकदा रडू आले, याचा अर्थ “संस्कार झाले” असा होत नाही. लहान मुले आणि वृद्ध माणसे हळवी असतात आणि त्याच्या डोळ्यात केंव्हाही टचकन पाणी येते हे आपण नेहमी अनुभवतो.
त्यामुळे ‘रडू येते’ हा संस्कार झाल्याचा निकष म्हणता येणार नाही. महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनातील साने गुरुजींची ‘धडपडणारी मुले’ म्हणजे चालते-बोलते संस्कार ठरली. संस्कार होतात ,किंवा ते झाले असे म्हणणे ही एक गोष्ट झाली आणि संस्कार झाल्याचा प्रत्यय प्रत्यक्ष आचरणामधून येणे ही अगदी निराळी गोष्ट झाली. त्या प्रत्ययाचे प्रमाण कमी-जास्त असू शकते. आणि त्याला अनेक कारणेही असू शकतात. पण चिमुटभर प्रत्यय तरी प्रत्यक्ष आचरणात यावा की नाही? महात्मा फुले, शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा आपल्याला वारसा असल्याचे जाहीर सभांमधून सांगत आलेल्या नेतृत्वाची बौद्धिक व सांस्कृतिक दिवाळखोरी आपण पाहत आलो आहोतच. (त्या थोर सुधारकांचे साहित्य वाचताना आपल्या या नेत्यांना काय कमी रडू आले असेल?)

’श्यामची आई’ काय किंवा संस्कारक्षम म्हटली जाणारी इतर असंख्य पुस्तके काय, ती केवळ वाचून वाचकांवर खरोखरीच संस्कार होत आले असतील तर आताचे राजकीय-सामाजिक-धार्मिक आणि सांस्कृतिक पर्यावरण आता आहे तितके ओंगळवाणे असायला नको होते!

‘श्यामची आई’ हे पुस्तक अप्रतिम आहे! गुरुजींनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ‘मातेचा महिमा’ हे या पुस्तकातील मध्यसूत्र आहे आणि सगळ्या प्रकरणामधून गुरुजींनी ते फार सहज आणि सुंदर रीतीने खेळविले आहे. गुरुजी प्रवचनाच्या ओघात जे असंख्य संदर्भ देतात ते स्तिमित करणारे आहेत. वसिष्ठ ऋषींची गोष्ट ते सांगतात (पृ.२/३), ज्ञानेश्वरीची साक्ष काढतात (पृ.५१), पांडव प्रताप’चा उल्लेख करतात (पृ.५५), मध्येच त्याना टागोर आठवतात (पृ.६५), मध्येच कवी मोरोपंतांच्या चरित्राची आठवण काढतात (पृ.७५), पतंजली काय म्हणतो ते सांगतात (पृ. १३२ आणि कधी सॉक्रेटीसही. (पृ.१३२)! – हे आणि असे खूप काही प्रवचनाच्या ओघात येते तेंव्हा जाणवते की गुरुजींनी ते सगळे आत्मसात केले आहे. (आणि अर्थात ते सगळे प्रौढ वाचकांसाठीच आहे!)
गुरुजींची थेट बाळबोध मराठी ही खास त्यांचीच भाषा आहे. लालित्य, निरतिशय सुंदर कल्पना विलास ही शिवाय निराळीच! ‘श्यामची आई’ पुस्तक वाचताना मिळणारा तो एक स्वतंत्र आनंद आहे.
-“आई कधी मला प्रेमाने थोपटी तर कधी रागाने धोपटी. दोन्ही प्रकारांनी ती मला आकार देत होती.” (पृ.३९)
“(चिमणीला) शेवतीजवळ किंवा मोगरयाजवळ पुरा. शेवंतीच्या झाडाला सुदर फुले येतील .मोगऱ्याची फुले अधिक तजेलदार दिसतील. कारण तुम्ही त्या पिलाला प्रेम दिले आहे. ते प्रेम ते पिलू विसरणार नाही. त्या फुलात तुमच्यासाठी ते येईल व तुम्हाला गोड वास देईल.”’ (पृ. ४८)
“—एक तारा तुटला आहे. तो हे आपले घर पाहण्यासाठी आला आहे.” (पृ.४५).
“महमदाला लोक म्हणत, “तू देवाचा पैगंबर असशील, तर चमत्कार करून दाखव.” तेंव्हा महमद म्हणाला, ”साऱ्या सृष्टीत चमत्कार आहेत. मी आणखी कशाला करू? समुद्रावरून तुमच्या लहान लहान नावा वाऱ्याने जातात, हा काय चमत्कार नाही? त्या अफाट सागराच्या वक्षस्थळावर निर्भयपणाने त्या नाचतात, डोलतात, हा चमत्कार नाही का? रानात चरावयास गेलेली मुकी गुरे तुमच्या घरी प्रेमाने परत येतात, हा चमत्कार नाही का? वाळवंटात झुळझुळ झरे दिसावे, वाळवंटात मधुर अशी खजुराची झाडे असावी, हे चमत्कार नाहीत का?” असे सांगत शेवटी महमद म्हणाला,“माझ्यासारख्या एका अडाण्याच्या तोंडातून तो कुराण वदवितो हा चमत्कार नाही का?” (प्र१३०)

'श्यामची आई' हे पुस्तक खरे तर प्रौढ स्त्री –पुरुष वाचकांसाठीच आहे, हे एव्हाना पुरेसे स्पष्ट झाले असावे. पुस्तकामध्ये गुरुजींनी प्रसंगी त्यांच्या आई-वडिलांनाही दोष दिला आहे, हे पाहिल्यावर तर त्याविषयी खात्रीच पटते. गुरुजी लिहितात – " आज मी माझ्या आईबापांच्या त्या प्रेमातही दोष पाहीन. त्यांनी स्वतःच्या गावातील एका गरीबाच्या मुलाला खर्वस दिलास असता तर? शेजारची मुले त्याना श्यामचीच रूपे का न वाटावी?—
" (पृ.१२४) किंवा ---"ती बाग म्हणजे आमचे वैभव. पण ते आमचे वैभव नसून आमचे पाप होते.—आईच्या अंगावरचे दागिने कुठून आले? पाणीदार मोत्यांची नथ. खेड्यातील गरीब बायकांच्या डोळ्यातील मोत्यांसारख्या अश्रूनी ती बनलेली होती—" (पृ.७).

समारोप करताना असे म्हटले पाहिजे की 'श्यामची आई' हे पुस्तक लहान मुलांसाठी नाही.
ते लहान मुलांसाठी आहे असे म्हणताना आपण ते काळजीपूर्वक आणि सगळेच्या सगळे वाचलेले नाही. तसे वाचूनही ते लहान मुलांसाठीच आहे असे आपण म्हणणार असू तर ती शुद्ध फसवणूक आहे; आपली आणि मुलांचीही. प्रौढांनी स्वतःची जबाबदारी लबाडीने टाळली आहे.

**माधव वझे** /७, वीणा अपार्टमेंट, कर्वे रोड/स्टेट बँकेच्या मागे/पुणे ४११ ००४.
vazemadhav@hotmail.com
Tel: 020-25454848